# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK**
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक – ४२२००४, Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
**EPABX:** 0253-2539100-300, **Fax:** 0253-2539171, **Phone:** 0253-2539173
**Website** : www.muhs.ac.in, **E-mail :** sw@muhs.ac.in

**डॉ. कालिदास द. चव्हाण**
एम.बी.बी.एस., एम.डी. (न्यायवैद्यकशास्त्र)
**प्र.कुलसचिव**

**Dr. Kalidas D. Chavan**
M.B.B.S. M.D. (Forensic Medicine)
**Offg. Registrar**


**मआविवि/एसडब्ल्यू/स्कीम/५.२/१४८८/२०१७** **दिनांक: ०१/०८/२०१७**

**"परिपत्रक क्र.१३ /२०१७"**

**प्रति,**
**मा. अधिष्ठाता/प्राचार्य,**
**सर्व संलग्नित महाविद्यालये,**
**म. आ. वि. वि. नाशिक.**

**विषय : कमवा व शिका योजनेबाबत...**

**महोदय/ महोदया,**

कमवा व शिका योजनेचे शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांमध्ये पदवीपुर्व नियमित शिक्षण घेत असलेल्या गरीब, गरजु, हुशार व पदवी शिक्षण घेणा–या विद्यार्थ्यांचे प्रस्ताव विद्यापीठामार्फत मागविण्यात येत आहेत.

कमवा व शिका योजनेत आर्थिक अडचणीमुळे कोणत्याही विद्यार्थ्यांचे शिंक्षण थांबू नये याच भूमिकेतून विद्यापीठाने **"कमवा व शिका"** ही योजना अंमलात आणली आहे. गरीब, होतकरु व नियमित विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असतांना निवडक स्वरुपाच्या कामांची संधी उपलब्ध करुन देऊन त्या मोबदल्यात नियमानुसार योग्य तो मेहनताना देवून त्यांच्या आर्थिक गरजा भागविणे व त्यांच्या शिक्षणात हातभार लावणे हा मुख्य हेतू या योजनेच्या मागे आहे.

कमवा व शिका योजनेचा लाभ सर्व विद्यार्थ्यांपर्यत पाहोचविण्यासाठी सर्व संलग्नित महाविद्यालयांना योजनेची माहिती असणारे पोस्टर पाठविण्यात आले आहेत. अधिष्ठाता/प्राचार्य यांनी सदर योजना महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यापर्यत पोहोचवयाची आहे.

महाविद्यालयांच्या अधिष्ठाता/प्राचार्यांना कळविण्यात येते की, एका महाविद्यालयांतुन पाच प्रस्ताव स्विकारण्यात येतील. उपरोक्त नियमावली अंतर्गत पात्र विद्यार्थ्यांचे प्रस्ताव महाविद्यालयांच्या कव्हरींग लेटरसह दि.**३०/१०/२०१७** पर्यत विद्यापीठात स्विकारण्यात येतील. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठीची नियमावली सोबत जोडत आहे. उशिरा तथा विलंबाने प्राप्त झालेल्या कोणत्याही प्रस्तावावर विद्यापीठ

कार्यवाही करणार नाही. तसेच योजने सबंधीचे प्रस्ताव अर्ज (विहित नमुन्यातील सहपत्र "अ") व इतर कागदपत्रे विद्यार्थी कल्याण विभागात परस्पर स्वीकारले जाणार नाहीत. कृपया याची नोंद घ्यावी.

सदर योजनेचा लाभार्थी विद्यार्थ्यांना कशा प्रकारे फायदा झाला व सदर योजना कशाप्रकारे राबविली गेली याबाबतचा अभिप्राय (फिडबॅक) फॉर्म महाविद्यालय व विद्यार्थ्यांनी योजना संपल्यांनंतर भरुन पाठवावयाचा आहे. (सहपत्र "ब" व "क" ) विद्यापीठाच्या योजना हया विद्यार्थ्यांना मिळणारी सवलत आहे, त्यांचा हक्क नाही असे त्यांना अवगत करण्यात यावे. तसेच सर्व अटी व शर्तीबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार विद्यापीठाने राखीव ठेवलेले आहेत.

वर नमूद केलेल्या योजनेच्या अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे सर्व हक्क विद्यापीठाकडे राखुन ठेवण्यात आले आहेत. योजनाबाबतचा तपशील विद्यापीठाच्या www.muhs.ac.in (Departments→ Students' Welfare Dept. → Circular 2017-18) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**प्र. कुलसचिव**

**प्रत माहितीस्तव :** १) मा. कुलगुरु कार्यालय, मआविवि, नाशिक
२) मा. कुलसचिव कार्यालय, मआविवि, नाशिक
३) मा. वित्त व लेखा अधिकारी, मआविवि, नाशिक
४) सर्व विभाग प्रमुख, मआविवि, नाशिक
५) सर्व विभागीय कार्यालये, मआविवि, नाशिक

**सोबत : कमवा व शिका योजना नियमावली**

## – कमवा व शिका योजना नियमावली –

१) सदर योजनेचा लाभ फक्त पदवीपुर्व नियमित शिक्षण घेणारा विद्यार्थी, मागील वर्षात उत्तीर्ण झालेल्या, गरीब व गरजू विद्यार्थ्यांना देण्यात येईल. तसेच खालील प्रमाणे निकष धारण करणाऱ्या (**अ.क्र.अ ते ड**) विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही.

अ) पदव्युत्तर (Postgraduate )

ब) आंतरवासियता (Internship)

क) दुसऱ्या देशात वास्तव्य असलेले (Non Resident Indian - NRI)

ड) परराज्यातून आलेले (Other than Maharashtra State – OMS)

२) सदर योजनेकरीता एका महाविद्यालयातून फक्त पाच विद्यार्थ्याचे प्रस्ताव स्विकारण्यात येतील.

३) विद्यार्थ्यास भारत सरकार/शासनाच्या किंवा अन्य संस्थाकडून शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, फेलोशिप शुल्क परतावा, फी सवलत किंवा इतर काही अनुदान मिळत असले तरी देखील सदर विद्यार्थ्यांचे प्रस्ताव पात्र ठरविण्यात यावे. या करीता विद्यार्थ्यांकडून हमीपत्र घेण्याची आवश्यकता नाही.

४) ज्या विद्यार्थ्यांना हया योजनेचा लाभ घ्यावयाचा नाही त्यांचेकडून तसे लिहून विद्यापीठास कळवावे. (सोबत सहपत्र "ड" जोडले आहे) असे केल्याने प्रत्येक विद्यार्थ्यां पर्यंत कमवा व शिका योजना पोहचवता येईल..

५) कमवा व शिका योजनेचा कालावधी ८ महिने तसेच कमवा व शिका योजनेतंर्गत महाविद्यालयातील पात्र ठरविण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना कामाचा मेहनतना म्हणून आठ महिन्यांकरीता रु.१६,०००/- प्रती विद्यार्थी या प्रमाणे देण्यात येईल. विद्यापीठाचे अनुदान प्रति तास रु.५० × २ तास × २० दिवस = रु.२,०००/- दरमहा × ०८ महिने = रु.१६,०००/- अशाप्रकारे सुट्टयांचे दिवस वगळून दरमहा, आठ महिन्यांकरीता अनुदानाचे रेखांकित धनादेशाद्ववारेच वाटप करण्यात यावे.

६) ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांची १२ महिन्यांची उत्पन्नाची कमाल मर्यादा रुपये ६ लक्ष असेल असे विद्यार्थी योजनेचा लाभ घेऊ शकतील. महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांची यादी तयार करताना ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न सर्वात कमी असेल अशा विद्यार्थ्यांना प्रथम प्राधान्य देण्यात देऊन विद्यापीठाच्या दरवर्षीच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात केलेल्या तरतूदीनुसार कमालमर्यादेत अनुदानाचे वाटप करण्यात येईल.

७) कमवा व शिका योजनेसाठी उत्पन्नाचा समान निकष धारण करणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी पात्र उमेदवाराची निवड करण्यासाठी अ) मागिल वर्षाचे गुण ब) अटेंम्पट (Attempts) क) मुलींना प्राधान्य, यां निकषांच्या आधारे करण्यात यावे.

८) सदर योजनेचा लाभार्थी विद्यार्थ्यांना कशा प्रकारे फायदा झाला व सदर योजना कशाप्रकारे राबविली गेली याबाबतचा अभिप्राय (फिडबॅक) फॉर्म महाविद्यालय व विद्यार्थ्यांना योजना संपल्यांनर भरुन पाठवावयाचा आहे.(सोबत सहपत्र "ब व क" जोडले आहे)

९) कमवा व शिका योजनेचा आठ महिन्यांचा कालावधी संपताच १५ दिवसांच्या आत प्रस्ताव समायोजनासाठी विद्यापीठास पाठविणे बंधनकारक राहील.

१०) विद्यापीठाच्या सर्व योजनांचा पात्र विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक कारकीर्दीमध्ये दरवर्षी एका पेक्षा जास्त योजनांचा लाभ देण्यात येईल.

११) विद्यापीठाच्या योजना हया विद्यार्थ्यांना मिळणारी सवलत आहे. त्यांचा हक्क नाही असे त्यांना